# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली

**E-mail** – nhmgadchiroli2021@gmail.com

---

**आरोग्य सेवा**

जा.क्र.NHM/आस्था/५५९/२०२५.
कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक : ०८/१०/२०२५.

## उमेदवारांकरीता सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व मोबाईल मेडीकल युनिट अंतर्गत रिक्त पदांची पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत असून प्रसिद्ध जाहिरातीनूसार अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची अंतिम पात्र/अपात्र यादी दिनांक २५/०९/२०२५ रोजी जिल्हा परिषद गडचिरोलीचे www.zpgadchiroli.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून पात्र उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी दिनांक २९ व ३०/०९/२०२५ रोजी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये बरेचशे उमेदवार अनुपस्थित राहिल्याने पुरेशा उमेदवारांअभावी पदे रिक्त राहण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हा निवड समितीने प्रसिद्ध अपात्र यादीतील उमेदवारांना एक अंतिम संधी प्रदान करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

त्याकरिता दिनांक २५/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अपात्र उमेदवारांच्या यादीमधील उमेदवार ज्या कारणांकरिता अपात्र ठरलेले आहेत, अशा कारणांची संबधित उमेदवार पुर्तता करित असल्यास त्यांनी सादर केलेला ऑनलाईन अर्ज व भरती शुल्क भरल्याची प्रत तसेच अर्जामध्ये नोंदविलेल्या सर्व मुळ (Original) व स्वसाक्षांकित (प्रत्येकी १ Xerox) कागदपत्रासह **दिनांक १३/१०/२०२५** रोजी **सकाळी १०.०० वाजता राष्ट्रीय शहिद विर बाबुराव शेडमाके सभागृह, पहिला माळा, जिल्हा परिषद, गडचिरोली** येथे उपस्थित राहावे. याकरीता या कार्यालयाकडून कोणताही पत्रव्यवहार केल्या जाणार नाही. तसेच उमेदवारांना मुळ कागदपत्र पडताळणी करिता स्वखर्चाने उपस्थित राहावयाचे असून येण्या-जाण्याचा कोणताही भत्ता अथवा खर्च दिल्या जाणार नाही. तसेच विहित वेळेत उपस्थित राहण्याची जबाबदारी ही संबधित उमेदवारांची असून विहित वेळेनंतर उपस्थित झालेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत कागदपत्र पडताळणीची संधी प्रदान केल्या जाणार नाही. त्याचप्रमाणे याबाबत कोणतीही तक्रार स्विकारल्या जाणार नाही. तसेच उमेदवारांच्या आवश्यक सर्व मुळ कागदपत्रांच्या (Original Document) पडताळणी नंतर अंतिम पात्र / अपात्र उमेदवार जिल्हा निवड समिती निश्चीत करेल. याची संबधित सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष (निवड समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली